Vol 5 Issue 2 March 2015

ISSN No : 2230-7850

International Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-Chief
H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.org**

Indian Streams Research Journal
ISSN 2230-7850
Impact Factor : 3.1560(UIF)
Volume-5 | Issue-2 | March-2015
Available online at www.isrj.org

# *हैद्राबाद मुक्तीसंग्राम आणि जंगल सत्याग्रह*

***राजेंद्र धाये***

'सहयोगी प्राध्यापक' , इतिहास विभागप्रमुख, संत रामदास महाविद्यालय, धनसांवगी,
ता. धनसांवगी, जि. जालना.

***सारांश :–*** निजामाच्या अन्यायी राजवटीविरुध्द शहरी भागांतून सभा, संमलने, परिषदा इत्यादी माध्यमातून तर विरोधाचा आवाज वाढत होताच; परंतु आता ग्रामीण भागातूनही जंगल सत्याग्रहाच्या माध्यमातून या राजवटीविरुध्द जनमत एक होऊ लागले होते. निजाम सरकारला मिळणाऱ्या अबकारी उत्पन्नाचा ओघ बंद पाडायचा हाच या जंगल सत्याग्रहामागचा प्रमुख उद्देश होता. जंगल सत्याग्रहामध्ये खेड्यापाड्यातील लोकांनी आपल्या कुटूंबातील व्यक्तींचा कसलाही विचार न करता या कार्यात स्वतःला झोकून दिले. या जंगल सत्याग्रहात अनेकांना आपले प्राण गमवावे लागले. काहींना अटक झाली नंतर त्यांना सोडून देण्यात आले.

हैद्राबाद मुक्तीसंग्रामात निजामाच्या विरोधात लढणाऱ्या या लोकांमध्ये (सैनिक) मुस्लिमांविषयी द्वेष असल्याचे आपणास आढळत नाही. केवळ अत्याचारी निजाम, रझाकार व जुलूम करणारे पोलीस यांच्या विरोधातच हा लढा होता. हैद्राबाद मुक्तीसंग्रामाच्या या लढ्याला दडपून टाकण्याचा प्रयत्न निजामाने केला; परंतू जसजसा निजामाचा विरोध होऊ लागला तस तशी सामान्य जनतेच्याही मनात या अन्यायी राजवटीविषयी चिड वाढत गेली आणि हा मुक्तीसंग्रामाचा लढा अधिकच धारदार बनला, अन्यायी निजामाच्या जोखडातून हैद्राबाद संस्थान मुक्त करण्यासाठी खेड्यापाड्यातील ज्या गोरगरीब शेतकरी, शेतमजूर, कामगार, दलित आणि स्त्रिया यांनी आपल्या संसाराचा, कुटूंबाचा आणि सुखाचा त्याग करुन या जंगल सत्याग्रहात स्वतःला झोकून दिले, अनेक संकटांना तोंड दिले. अनेकजण यावेळी पोलीसांनी केलेल्या गोळीबारात ठार झाले. असेच काही मुक्तीसंग्रामाचे सैनिक शासकीय मदतीपासून दूर तर राहिले नसतील ना?

## *प्रस्तावना :–*

15 ऑगस्ट 1947 रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले, सुमारे दिडशे वर्षाच्या गुलामीतून ब्रिटीशांनी भारताला मुक्त केले. इंग्रज भारतातून निघून गेले; मात्र भारतातील काही प्रमुख संस्थानिकांचा भारतीय संघराज्यात सामील होण्याचा अथवा आपले स्वतंत्र अस्तित्व ठेवण्याचा निर्णय संबंधीत संस्थानावरच सोपवला. हैद्राबाद संस्थान सोडून बाकी सर्व संस्थाने भारतात विलिन झाली. हैद्राबादच्या निजामाने आपले संस्थान स्वतंत्र राहील असे घोषीत केले. निजामाच्या या निर्णयाला 'रझाकार' संघटनेचा पाठींबा होता. निजामाच्या हैद्राबाद स्वतंत्र राहील या भूमिकेमूळे संघर्षाची ठिणगी पडली आणि हैद्राबाद मुक्तीसंग्रामाची चळवळ जोम धरु लागली.

हैद्राबाद संस्थान हे इतर संस्थानांच्या तुलनेत सर्वात मोठे संस्थान होते आणि अनेक कारणांसाठी ते भारतातील ब्रिटीश साम्राज्याची भक्कम संरक्षक तटबंदी म्हणून ओळखले जात होते. ब्रिटीश राजसत्तेच्या अस्तकाली हैद्राबादचे निजामी राज्य स्वतंत्र आणि सार्वभौम राज्याची महत्वाकांक्षा बाळगू लागले होते. आपल्या राज्याच्या सीमाविस्ताराची आणि सागरकिनाऱ्यापर्यंत पोचणारा भूमिमार्ग मिळविण्याची ते स्वप्न पाहू लागले होते.[1] हैद्राबादचा मुक्तीसंग्राम ही जनतेची एक चळवळ होती. लोकशाहीचे हक्क व मानवी जीवनाच्या चिरंतन मूल्यांच्या जपणूकीसाठी ही चळवळ होती. हिंदू प्रजेनं मुसलमान राजाविरुध्द केलेली ही जातीयवादी चळवळ नव्हती, मुस्लिम जातीयवादाचा दक्षिणेतील बालेकिल्ला असलेले हैद्राबाद संस्थान जातीयवादाच्या कर्दमातून मुक्त करण्यासाठी ही चळवळ होती.[2] निजामाच्या राजवटीला (अन्यायी) प्रतिकार करण्याचा, विरोधात आवाज उठविण्याचा अनेकांनी प्रयत्न केला. संघटीत झाल्याशिवाय निजाम राजवटीला विरोध करणे अशक्य आहे हे लक्षात आल्यानंतर अनेक संघटना उदयास आल्या, प्रत्येकाने विरोधाचे संघर्षाचे वेगवेगळे मार्ग निवडले. निजाम राजवट उलथून टाकण्यासाठी सर्वजण एकत्र आले.

हैद्राबादच्या स्वातंत्र्यसंग्रामाच्या लढ्यात सर्वच स्तरातून सहभाग नोंदवला गेला. झेंडावंदन सत्याग्रह, जंगल सत्याग्रहातून हजारो माणसे तुरुंगात गेली. हा सर्व प्रकार निजामाच्या अन्यायी सत्तेविरुध्दचा होता.

### *जंगल सत्याग्रह :*

हैद्राबाद मुक्तीसंग्रामात सर्व स्तरातून सहभाग नोंदवला गेला. निजामाची राजवट उलथून टाकण्यासाठी जनता आसुसली होती. शहरांमधून जसा निजामाच्या राजवटीला विरोध होऊ लागला तसा ग्रामीण भागांमधूनही निजामाच्या राजवटीला विरोध होऊ लागला होता.

हैद्राबाद राज्यात शिंदीच्या झाडाचे अत्यंत महत्व होते. कोठेही हे झाड उगवले तर त्याला तोडायची मनाई होती. एखाद्याने तोडलेच तर त्याला कायद्याने शिक्षा भोगावी लागे. त्यामुळे कष्ट करुन शेतीचे पीक उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्याला हे झाड सवतीप्रमाणे वाटे. वहितीच्या जमिनीत आलेल्या झाडांना देखील तोडण्याचा अधिकार शेतकऱ्याला नव्हता. कारण, असे झाड तोडले तर सरकारच्या अबकारी उत्पन्नावर परिणाम होऊ नये म्हणून शिंदीची जंगले सांभाळलेली होती. दक्षिणेत शिंदीचे झाड कोठेही येते. त्याचा त्रास हैद्राबादच्या शेतकऱ्यांनी खुप काढला आहे.[3] हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसने जंगल सत्याग्रहाची चळवळ हाती घेतली. खेड्यापाड्यातील शेतकऱ्यांना या चळवळीत सहभागी करण्याचा हा एक मार्ग होता. स्टेट कॉंग्रेसची पाळेमुळे खेड्यापाड्यात चांगलीच रुजली होती. त्यामुळे निजाम सरकारविरुध्द लढ्यासाठी शेतकरी तयार झाला.[4] खेड्यापाड्यांतून, शहरांतील सत्याग्रहाहून निराळा प्रकार अवलंबिला गेला, खेड्यांतून विशेषतः जे शेतकरी तुरुंगात गेले ते जंगल सत्याग्रहाच्या माध्यमातून, हैद्राबाद संस्थानात शिंदीच्या झाडापासून दारु (शिंदी) काढली जात असे. त्यावर जबर कर होता. या कराचे फार मोठे उत्पन्न सरकारला अबकारी उत्पन्न म्हणून मिळत असे. खेड्यापाड्यांतून कृतिसमितीने सामुदायीकपणे व व्यक्तीशः शिंदीची झाडे तोडून सत्याग्रह करण्याचा कार्यक्रम दिला, तो असा हिशेब करुनच की या माध्यमातून खेडूत जनता सविनय कायदेभंगात सामील होईल. हे अनुमान बरोबर ठरले. एकतर शेतकऱ्यांना त्यांच्या शेतामध्ये असणाऱ्या शिंदीच्या झाडामूळे सरकारचा व त्याच्यामार्फत गुत्तेदारांचा फार जाच होता. शिवाय शिंदीचे बन इतर झाडांच्या तुलनेत झपाट्याने वाढणारे, त्यामुळे शेतकऱ्यांची शेती कालांतराने सिंदबनाने व्यापली जाण्याची भीती सदैवच होती. एरवी या शिंदीच्या झाडांना हातही लावता येत नसे. शेतकऱ्यांना जंगल सत्याग्रहाने या दृष्टीने एक संधीच उपलब्ध करुन दिली.[5] जंगल सत्याग्रहामुळे शहरांप्रमाणेच ग्रामीण भागातही निजामाच्या विरोधात जनतेमध्ये एक नवचैतन्य निर्माण झाले.

15 सप्टेंबर 1947 पासून जंगल सत्याग्रहाला सुरुवात झाली. शिंदीच्या झाडाच्या लिलावापोटी निजाम सरकारला मिळणारा महसूल बंद व्हावा हा जंगल सत्याग्रहाचा प्रमुख हेतू होता. निजामाच्या राज्यात शिंदीची झाडे तोडणे हा कायद्याने गुन्हा होता. शिंदीच्या झाडाला मडके अडकविणे, शिंदी काढणे हे काम अस्पृश्यांना करावे लागे. असे मडके अडकवलेले झाड भल्या पहाटे मडके काढून घेतल्यानंतर तोडीत, पण तो अस्पृश्य कधीच कुणाचे नाव निजाम पोलीसांना सांगत नसे. जेंव्हा स्टेट कॉंग्रेसने जंगल सत्याग्रहाचा आदेश दिला तेंव्हा दलितांनीही यामध्ये सहभाग नोंदविला. दलित स्त्रीयाही या सत्याग्रहात सहभागी झाल्या. परभणी जिल्हयात शंभर टक्के जंगल सत्याग्रह यशस्वी झाला, तो दलित व शेतकरी वर्ग यात सामील झाल्यामूळेच. जंगल सत्याग्रहात स्वातंत्र्य प्राप्तीच्या निर्धाराने स्वतःच्या रक्ताने सह्या केलेली शेकडो प्रतिज्ञापत्रे स्वामी रामानंद तीर्थांना सादर करण्यात आली.6 कृतिसमितीने खेड्यापाड्यांतून जंगल सत्याग्रहाचे आदेश दिले. खेड्यापाड्यातील सर्वसामान्य जनतेला या चळवळीत सहभागी करुन घेण्याचा चांगला मार्ग होता. स्टेट कॉंग्रेसची पाळेमुळे खेड्यापांडयात रुजली होती. त्यामुळे निजामाच्या अन्यायी राजवटीविरुध्द लढण्यासाठी शेतकरी वर्ग तयार झाला.

ग्रामीण भागातील लढ्याला अधिक स्फोटक आणि व्यापक स्वरुप आले ते जंगल सत्याग्रहांपासून, खेडोपाडी जंगल सत्याग्रह झाले. काही सामुदायीक होते तर काही व्यक्तीगत स्वरुपाचे होते. जंगल सत्याग्रहापासूनच सरकार आणि जनता एकमेकांच्या समोरासमोर मैदानात उतरले.[7] अंबड तालुक्यात खेड्यापाड्यातून जंगल सत्याग्रह झाला. निजामाला अबकारी कर देणारी शिंदीची झाडे बघता–बघता जमीनदोस्त झाली. सिंदखेड, लिंबी, जांब, पिंपरखेड, मूर्ती, कुंभार पिंपळगाव, ढोकळवाडी, तिर्थपूरी, गुंज, घाणेगाव, मच्छींद्रनाथ चिंचोली, जामखेड इत्यादी ठिकाणी सत्याग्रह झाले. गावातील जनतेने उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. सिंदखेडला तर शिंदीची खूप दाट बनं होती. जंगल सत्याग्रहात सहभागी झाल्यामूळे निजामाच्या अटकसत्रात अनेकांना अटकही झाली. अंबड तालुक्यात सगळ्यात मोठा सत्याग्रह सिंदखेडला झाला. सिंदखेडचा अख्खा परिसर शिंदीच्या झाडांनी व्यापलेला होता. या गावातून शिंदीपासून काढलेली दारु पखालीने बाहेरगावी घेऊन जावी लागत असे. निजामाच्या अबकारी उत्पन्नाला या ठिकाणच्या जंगल सत्याग्रहामूळे फार मोठा फटका बसला.[8] सिंदखेडची सर्व जनता उत्तमरावांनी जंगल सतयाग्रहासाठी संघटीत केली. सिंदखेडमध्ये भरपूर प्रमाणात शिंदीची झाडे हाती, बारा गावांना येथून शिंदीचा पुरवठा होत असे, अशी माहिती उत्तमरावांनी दिली. हा पुरवठा पखालीच्या साह्याने होत असे. 300 ते 400 मडकी झाडाला टांगलेली असत. उत्तमराव पूढे म्हणाले, डफडे आणि सिंग वाजवून गाव जमा करायचे नंतर वंदेमातरम् हे गीत गात रोज एक डाग (शिंदीच्या झाडाचे वन) तोडून काढायचा. असा का हा कार्यक्रम चार/पाच दिवस चालला. रोज साधारण 50 कुऱ्हाडी चालायच्या.[9] जामखेडला शिंदीची झाडे अल्प प्रमाणात होती. अबकारी करात मोडणारी मोहाची झाडे या परिसरात जास्त होती. जंगल सत्याग्रहात गावकऱ्यांनी (जामखेडच्या) उत्स्फूर्त सहभाग घेतला. स्वामीजींच्या जयघोषात आणि स्टेट कॉंग्रेसच्या जयघोषात परिसर दुमदुमून गेला. 20–25 कार्यकर्त्यांची तुकडी सपासप झाडे कापू लागली. रात्री पाऊस पडला होता. दुपारीही पावसाची झिमझिम चालूच होती. भर पावसात चिखलात सपासप मोहाची झो खाली पडू लागली, रंगनाथ गुरव, भागूजी खंडागळे, शिरसुबा पांढरे, भोजने, दशरथ खंडागळे ही

मंडळी मोहाची झाडे सपासप तोडत होती. पाऊस असतानाही मूर्दाड जमिनीवरील मोहाची झाडे जमिनदोस्त करण्यात आली. दुसऱ्याच दिवशी ठोकळवाडीत 4–5 निरपराध गावकऱ्यांना पोलीसांनी अटक केली.10 निजाम सरकारला या झाडांपासून मिळणारे उत्पन्न बंद पाडणे हाच जंगल सत्याग्रहामागे प्रमुख उद्देश होता. या काळात जंगल सत्याग्रहाला उधानच आले होते. नांदेड, परभणी जिल्ह्यातही फार मोठ्या प्रमाणात जंगल सत्याग्रह झाले.

नांदेड जिल्ह्यात झालेल्या जंगल सत्याग्रहाचे स्वरुप खूपच मोठे व प्रक्षोभक राहीले. पाटनूरच्या जंगल सत्याग्रहाने तर जिल्ह्याच्या स्वातंत्र्य लढ्याला निर्णायक अवस्थेत आणून सोडले. पाटनूरच्या नंतर टेळकी (ता. कंधार) व डोर्ली (ता.हदगाव) येथील जंगल सत्याग्रह खूपच गाजले. दोन्ही ठिकाणी गोळीबार झाले. डोर्लिला 6 जन तर टेळकीला 4 जण ठार झाले.[11] अंबाजोगाई भागात चनई, येथे जंगल सत्याग्रह झाला. या जंगल सत्याग्रहात राडी, मुढेगाव, भाकरंबा, चनई, बनसारोळा वगैरे गावांच्या शेतकऱ्यांनी भाग घेतला. त्यांची संख्या चारशे ते पाचशे इतकी होती.[12] या सत्याग्रहाची आठ ऑगस्ट ही तारीख ठरलेली होती. त्या दिवशी आग्यामोहळ उठावे त्याप्रमाणे सर्व बाजूंनी तयारीनिशी शेतकरी आले. आणि त्यांनी शिंदीची झाडे तोडण्यास आरंभ केला. या कार्यक्रमाचे पुढरीपण चनईचे श्री. बाबुराव तुकाराम अजगुंड यांच्याकडे होते. पहिल्या दिवशी 500 झाडे तुटली. मक्तेदार घाबरला त्याने पोलिसांना बोलावून आणले दि. 09 ला देखील हा कार्यक्रम पुढे चालूच होता. त्यावेळी अंबाजोगाईहून पोलीस आले. त्यांनी शेतकऱ्यांवर लाठीहल्ला करण्यास आरंभ केला. गोळीबार चालू केला. त्यामुळे शेतकरी पांगले. प्रमुख दहा लोकांना पकडून त्यांच्यावर राजद्रोहाचा खटला भरला.[13] खेड्यापाड्यात जंगल सत्याग्रहाची चळवळ जोरात सुरु झाली होती. निजामाच्या राजवटीला आता ग्रामीण भागातूनही फार मोठ्या प्रमाणात विरोध सुरु झाला होता.

परभणी जिल्ह्याच्या जिंतूर तालुक्यात कांडली या गावी झालेला जंगल सत्याग्रह सर्वात मोठा व सरकारवर दहशत बसविणारा होता. कांडलीच्या या जंगल सत्याग्रहात किमान दहा हजार शेतकऱ्यांनी भाग घेतला होता. विशेष असा की या सत्याग्रहात 1500 स्त्रीयांनी प्रत्यक्ष भाग घेतला.[14] औरंगाबाद जिल्ह्यात जी दोन प्रकरणे गाजली ती दोन्हीही–लाडसांवगी व कोलता टाकळी – जंगल सत्याग्रहातूनच निर्माण झाली होती. कोलता टाकळी येथे रझाकार, पोलीस आणि जनता यांच्या दरम्यान एक जोरदार लढाईच झाली. कोलता टाकळी हे औरंगाबाद जिल्ह्यात खूप आत असलेले गाव. तेथील गढीमध्ये स्वातंत्र्य संग्रामातील भूमिगत सैनिकांनी आश्रय घेतला होता. ही गढी अक्षरशः एखाद्या किल्ल्यासारखी लढवली गेली. या भागात फार मोठ्या प्रमाणावर जंगल सत्याग्रह झाले.[15]

जंगल सत्याग्रह साधारपणे सटेंबर ते नोहेंबर 1947 पर्यंत झाले. त्या काळात कोळी, डोर्ली सोनारी, टेकळी (जि. नांदेड) येथे गोळीबार झाले. टेळकी हे नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्तील गाव. त्या तालुक्यात कम्यूनिस्ट पक्षाचे काम होते. अंबाजोगाईचे वकील असलेले आर.डी. देशपांडे काही वर्षे बीड जिल्ह्यात महाराष्ट्र परिषद व नंतर स्टेट काँग्रेस या संघटनांचे पूर्णवेळ जिल्हा संघटक होते. ते स्वतः, व्यंकट सगदेव, बाबुराव पालिमकर, तात्या कुर्तडीकर, वासुदेव भुसारी आणि पुरभाजी या कम्यूनिस्ट कार्यकर्त्यांसह कंधारमध्ये भूमिगत म्हणून कार्य करीत होते. पूर्वी महाराष्ट्र परिषदेत व नंतर स्टेट काँग्रेसमध्ये असलेले आनंदराव टेळकीकर हे एक सत्शील आणि या भागात लोकप्रिय असलेले शेतकरी कार्यकर्ते. ते कम्यूनिष्टांबरोबर कार्य करीत हाते. या भागात म्हणजे कंधार, मुखेड आणि देगलूर भागात स्टेट काँग्रेस तर्फे नागनाथ परांजपे पूर्णवेळ कार्यकर्ते म्हणून होते. तेही भूमिगत होते. टेळकीला मोठा जंगल सत्याग्रह झाला. जंगल सत्याग्रहात भाग घेतला म्हणून काही लोकांना पकडण्यात आले. जंगल सत्याग्रहानंतर राखीव पोलीसदल आणि घोडदळ यांचा फार मोठा तळ येथे पडला होता. कार्यकर्त्यांना पकडले म्हणून लोक चिडले. तशी एकूण राजवटीबद्दल चीड होतीच. तिला कृतिचे रुप येऊ बघत होते. भोवतालचे लोक जमले व त्यांनी आपले सहकारी सोडवून घेण्यासाठी पोलीसांवर हल्ला केला. बराच मोठा संघर्ष उडाला. शेवटी पोलीसांना गोळीबार करावा लागला. त्यात चार जण ठार झाले.[16] कृतिसमितीने दिलेल्या आदेशांप्रमाणे खेड्यापाड्यांतून जंगल सत्याग्रह सुरु होते.

नांदेड जिल्ह्याचे तीन प्रमुख विभाग पाडण्यात आले होते. या तीन विभागात अनंत भालेराव, नागनाथ परांजपे आणि रघुनाथ रांजणीकर हे तीन प्रमुख पूर्णवेळ कार्यकर्ते काम करत होते, नांदेड शहरापासून जवळ असलेल्या अर्धापूर रोड पासूनचा म्हणजे हदगाव, नांदेड व भोकर या तालुक्याचा भाग अनंग भालेराव यांच्याकडे होता. 07 ऑगस्टपासूनचे सर्व कार्यक्रम पार पाडून ऑक्टोंबर 1947 मध्ये तिन्ही विभागातील कार्यकर्ते बारड भागात एकत्रित आले. या भागात बारडचे राजाराम देशमुख, तेंव्हा अगदी तरुण असलेले बारडचेच साहेबराव देशमुख व बारड नजीकच्या लहानचे दुसरे तरुण व वजनदार कार्यकर्ते आबासाहेब लहानकर स्वातंत्र्याच्या चळवळीत आपल्या सर्व शक्तीनिशी उतरले. या लोकांचे या सर्व टापूत वजन होते. वजनदार मराठा कुटूंबातील या कार्यकर्त्यांच्या व त्यांच्या सहकाऱ्यांच्या मनात देशभक्तीची ज्योत प्रज्वलित झाली व बारडच्या केंद्राने आपल्या मगदुरापलीकडे जाऊन इतिहास घडविला. हा जवळ–जवळ 60–70 गावांचा टापू होता. भूमिगतांची टोळीही संख्येने खूप वाढली होती. त्यांच्या पाठलागासाठी पोलीस, घोडदळ व राखीव पोलीस यांनी हा टापू अक्षरशः पिंजून काढला होता. लोकही खूप संतप्त झाले होते. त्यांच्या असंतोषाला वाट करुन देणे आवश्यक होते; म्हणून जंगल सत्याग्रह करण्याचे ठरले. लहान बारड आणि पाटनूरच्या मध्यभागी असलेल्या नागेली या गावापासून जंगल सत्याग्रही कुऱ्हाडी घेऊन निघतील व पाटनूर नजीकच्या अपरंपाराच्या माळावर जंगल सत्याग्रह करतील; असे ठरले. सर्वत्र निरोप गेले. बारड आणि लहानप्रमाणे नागेली हे ही भूमिगतांचे मोठे केंद्र होते. तेथील एक वजनदार गृहस्थ चिमणाजी पाटील आंदोलनात उतरले होते. नागेली हे पहिलवानाचे गाव म्हणून ओळखले जात असे. चिमणाजी पाटलांमूळे हे सर्व लोक आंदोलनाला येऊन मिळाले. सुमारे 7 ते 8 हजार लोक आवश्यक त्या सोपस्कारानंतर पाटनूरकडे निघाले. हळूहळू हा समुदाय वाढत गेला. पाटनूरच्या माळात ही सेना शिरली, 3–4 तासात सागवानाची शेकडो झाडे जमीनदोस्त झाली.[17] यानंतर सत्याग्रही व पोलीसांमध्ये चांगलीच चकमक झाली. सत्याग्रहींची आक्रमक भूमिका पाहून पोलीसांनी

शरणागती स्विकारली. या सर्व प्रकारामुळे सत्याग्रहींचे मनोबल वाढले.

***संदर्भ :***

1.भालेराव अनंत, हैद्राबादचा स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा, मौज प्रकाशन खटाववाडी मुंबई, सप्टेंबर –1987, पृ. क्र. पंधरा.
2.खोत श्रीनिवास, विर्धे दिगंबर, हैद्राबादच्या मुक्तीसंग्राम आणि आम्ही, साकेत प्रकाशन गांधीनगर औरंगाबाद, प्रथमावृत्ती – 1993, पृ.क्र. अकरा.
3.कित्ता, पृ.क्र. 63.
4.कित्ता
5.भालेराव अनंत, उपरोक्त, पृ.क्र. 332–333.
6.गायकवाड नरेंद्र, मराठवाड्यातील दलित चळवळ आणि हैद्राबादचा स्वातंत्र्य संग्राम, सुगावा प्रकाशन पुणे–1990, पृ.क्र. 116.
7.भालेराव अनंत, उपरोक्त, पृ.क्र. 341.
8.धाये राजेंद्र, हैद्राबाद संस्थान मधील स्वातंत्र्य संग्रामात अंबड तालुक्याचे योगदान, एम्.फिल्. लघुशोधप्रबंध, अप्रकाशित, नोहेंबर–2000, पृ.क्र. 50.
9.कित्ता, पृ.क्र. 65.
10.कित्ता, पृ.क्र. 115–116.
11.भालेराव अनंत, उपरोक्त, पृ.क्र. 341.
12.खोत श्रीनिवास / वर्धे दिगंबर, उपरोक्त, पृ.क्र. 63.
13.कित्ता, पृ.क्र. 64.
14.भालेराव अनंत, उपरोक्त, पृ.क्र. 341.
15.कित्ता, पृ.क्र.341.
16.कित्ता, पृ.क्र. 368–369.
17.कित्ता, पृ.क्र. 369–370.



***राजेंद्र धाये***
'सहयोगी प्राध्यापक' , इतिहास विभागप्रमुख, संत रामदास महाविद्यालय, धनसांवगी,
ता. धनसांवगी, जि. जालना.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.org